शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.०५/२०२०

| | |
|---|---|
| श्रीमती विजया जगन्नाथ पिंजारी | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | |
| १. रयत शिक्षण संस्था, सातारा जि.सातारा.<br>२. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड, ता.वाई, जि.सातारा | वि.प. |

रयत शिक्षण संस्था, सातारा या संस्थेचे यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड, ता.वाई, जि.सातारा येथील शिक्षिका श्रीमती विजया जगन्नाथ पिंजारी यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.०७/१२/२०२० रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मी दि.०१/१२/२००० नेमणूक दिनांकापासून पात्रता प्राप्त प्राध्यापक असून ती पात्रता २००६ च्या यु.जी.सी. च्या नियमाने सिध्द् झाली. माझ्या सर्व सेवाशर्थी व निकष तपासून शिवाजी विद्यापीठाने मला ३ वेतनश्रेण्या/स्थाननिश्चितीचे लाभ लागू केले. मात्र रयत शिक्षण संस्था पदाधिकारी, क्लार्क, शरदचंद्र पवार महाविद्यालयाचे प्राचार्य टी.एन.घोलप, क्लार्क, यशंवराव चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य (माजी) आर. बी. बावधनकर व क्लार्क, शिक्षण, सहसंचालक डॉ.अजय साळी, श्री.धनंजय माने क्लार्क यांनी मिळून संगनमताने मला एम.फिल पीएचडी, वेतनश्रेण्या, ३ वरिष्ठ वेतनश्रेण्या व सातवा वेतन आयोग दिला नाही. वरील सर्व घटकांनी संयुक्तरित्या पूर्वग्रह दूषित होवून मला अनुषंगिक लाभ दिले नाहीत त्यांनी मला लाभापासून वंचित ठेवले ते सर्वलाभ मला मिळावे व एजीपी ९०००/- वैयक्तिक फाईल प्रि.टि.एन.घोलप यांनी अद्याप दिली नाही, देत नाहीत. माझा ऑनलाईन वेतनप्रणालीत नावाचा समावेश करावा. सदर लाभ हेतूपुर्वक मला पात्र असून दिले जात नाहीत. ही माझी तक्रार आहे. प्राचार्य आर.बी.बावधनकरांनी, ऑनलाईनच्या नावाखाली माझे १८ महिन्यांचे वेतन थांबवले ते मला अद्याप मिळाले नाही ही माझी तक्रार आहे. माझी सत्यस्थिती तपासून आपण मला न्याय द्यावा. व माझे होणारे मानसिक व आर्थिक शोषन थांबवावे ही विनंती.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

१. डॉ.सौ.पिंजारी विजया जगन्नाथ यांच्या १८ महिन्याचे वेतन न मिळाल्याबद्दल तक्रार.

डॉ.सौ.पिंजारी विजया जगन्नाथ यांच्या १८ महिन्याचे वेतन न मिळणेबाबत मा.विभागीय सहसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचेकडे महाविद्यालयाने मागणी केलेली होती. परंतू मा.विभागीय सहसंचालक यांचेकडील पत्र क्रं.शिसस/उशि/कोवी/अनु/२/२०२७/४०२६ दिनांक २५ सप्टेंबर २०१७ या पत्रानुसार मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत- पुणे यांचेकडील निर्णयाअंती प्रलंबित वेतन थकबाकी अदायगी असल्यास प्राचार्यांनी रितसर प्रस्ताव सादर करणेविषयी सांगितले आहे. अद्याप पर्यंत मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत-पुणे यांची मान्यता आलेली नाही. तरीही महाविद्यालयाने थकीत वेतनाच्या बजेटमध्ये थकीत वेतन मिळणेसाठी महाविद्यालयाकडील पत्र क्रं.४१९ दिनांक ३०/०१/२०२० चे पत्रानुसार मागणी केलेली होती. त्यास मा.विभागीय सहसंचालक, कोल्हापूर विभाग, यांचेकडील पत्र क्रं. विसस/उशि/कोवी/वेतनपथक/८ दि.२७/०२/२०२० चे पत्रानुसार प्रस्ताव स्विकृत करता येत नाही असे सदर पत्रान्वये महाविद्यालयास कळविले आहे. तरी वरील दोन्ही संदर्भ पत्रे आपल्या माहितीसाठी पाठवून देत आहोत.

२. डॉ. सौ.पिंजारी विजया जगन्नाथ यांचा स्थाननिश्चिती/वेतननिश्चितीबाबतचा प्रस्ताव शरदचंद्र पवार महाविद्यालय, लोणंद या महाविद्यालयातून पाठविणेत आला होता. त्यांनी पाचवड कॉलेजमधूनही माझा प्रस्ताव पाठवावा अशी वेळोवेळी मागणी केल्याने आमचे महाविद्यालयाने सदर प्रस्तावाच्या झेरॉक्स काढून आमचेकडील पत्र क्रं. ५७७/२०१८-१९ दिनांक २८/०३/२०१९ चे पत्रानुसार सदर प्रस्ताव मा. विभागीय सहसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे कार्यालयाकडे पाठविला होता. विद्यापीठाने डॉ.सौ. पिजांरी विजया जगन्नाथ यांच्या मुळ नियुक्तीस शासन निर्णय दिनांक १३/०६/२००० व दि.१७/६/२००० नुसार मान्यता दिलेली आहे. वास्तविक पाहता अशा प्रकरणी स्थाननिश्चिती वा अन्य लाभ नियमाप्रमाणे देय ठरत नाहीत असे महाविद्यालयास कळविले आहे. तरी सदर प्रस्तावास मा.विभागीय सहसंचालक यांनी पाठविलेल्या पत्राची झेरॉक्स कॉपी आपल्या माहितीसाठी पाठवून देत आहोत.

३. डॉ.सौ.पिंजारी विजया जगन्नाथ यांचे वेतन ऑफलाईन पध्दतीने होत आहे. आमचे महाविद्यालयात दोन सेवक ऑफलाईन वेतन घेत आहेत. त्यामुळे ऑफलाईन वेतन घेणा-या सेवकांना ७ व्या वेतन आयोगानुसार मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी पगारात नाव समाविष्ठ करणेस परवानगी दिलेली नाही.

४. डॉ. सौ.पिंजारी विजया जगन्नाथ यांना ऑनलाईन वेतनात नांव समाविष्ठ करणेसाठी शासनाकडून पत्र दिले होते. त्याप्रमाणे त्यांनी विहीत नमुन्यातील हमीपत्र भरून देणेसाठी महाविद्यालयास कळविले होते. महाविद्यालयाने त्यांना सदर हमीपत्र देणेसाठी वारंवार लेखी पत्राने कळविले होते. परंतू त्यांनी विहीत नमुन्यातील हमीपत्र दिले नसल्याने त्यांना ऑनलाईन वेतनामध्ये समाविष्ठ केले नाही. त्यामुळे त्यांचे वेतन ऑफलाईन पध्दतीने केले जाते. सोबत त्यांना ऑनलाईन वेतनात नांव समाविष्ठ करणेसाठी शासनाचे पत्र, महाविद्यालयाने ऑनलाईन वेतनात नांव समाविष्ठ करणेसाठी दिलेल्या पत्रांच्या झेरॉक्स प्रती आपल्या माहितीसाठी पाठवून देत आहोत.

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

**समितीची निरिक्षणे :**

१. तक्रारदार यांनी १८ महिन्याचे वेतन न मिळाल्याबद्दल तक्रार अर्जात नमूद केली आहे.

याबाबत तक्रारदार यांनी आपली बदली दि. १५/०६/२०१६ रोजी यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड येथे करण्यात आली. हजर तारखेपासून पुढील १८ महिने या महाविद्यालयातून ऑफलाईन व ऑनलाईनचे निमित्त करून व चुकीच्या हमीपत्राची मागणी करण्यात आली. त्या प्रकारे हमीपत्र देणे आपणास क्रमप्राप्त नसताना शिक्षण सहसंचालक कोल्हापूर, रयत शिक्षण संस्था, लोणंद महाविद्याल, पाचवड महाविद्यालय येथील प्राचार्य व सचिव, पदाधिकारी इत्यादी यांनी लेखी स्वरूपात अशा हमीपत्राचा आग्रह धरला. तसेच सदर हमीपत्रात आपली सेवा सन २००० ऐवजी २००६ पासून ग्राह्यधरून ऑनलाईन वेतनप्रणालीत घ्यावे. तथापी आपली सेवा यामुळे पुढे जात असल्यामुळे आपण वस्तूस्थितीदर्शक हमीपत्र देण्याचा वारंवार प्रयत्न केला परंतू असे हमीपत्र घेण्यास संबधितांनी स्पष्ट नकार दिला असे कथन केले आहे.

याबाबत संस्था व महाविद्यालयाने दि.२८/०२/२०२३ रोजी समितीसमोर सादर केलेल्या लेखी अभिप्रायामध्ये डॉ.सौ.पिंजारी विजया जगन्नाथ यांच्या १८ महिन्याचे वेतन न मिळणेबाबत मा.विभागीय सहसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचेकडे महाविद्यालयाने प्रस्तावाद्वारे मागणी केलेली होती. याबाबत मा.विभागीय सहसंचालक, कोल्हापूर यांचेकडील पत्र क्रं.शिसस/उशि/कोवी/अनि-२/२०२२/९९६३ दि. २८/१२/२०२२ चे पत्रानुसार ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतननिश्चिती व अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सन २०२२-२३ मधील थकीत रक्कमांचे प्रस्ताव आमचेकडील पत्र क्रं.४७७/२०२२-२३ दि.०८/०२/२०२३ नुसार सादर केलेला आहे. सदर प्रस्तावात डॉ. सौ.पिंजारी विजया जगन्नाथ यांच्या १८ महिन्यांच्या थकीत वेतनाची मागणी महाविद्यालयाने केलेली आहे. सदर थकीत वेतनाची रक्कम त्यांना अदा करणेत येईल. सोबत मा. विभागीय सहसंचालक यांच्या मान्यता पत्राची आणि थकीत रक्कमांच्या प्रस्तावाची झेरॉक्स प्रत जोडली असल्याचे नमूद केले आहे.

या प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान समितीने संस्था व महाविद्यालयास तक्रारदार यांचेकडे मागणी केलेल्या शासन निर्देशानुसार जो हमीपत्राचा नमुना कळविणेत आलेला होता त्याची प्रत समितीसमोर सादर करण्याची सूचना केली, तथापी अनेकवेळा संधी देऊनही संस्था व महाविद्यालयाकडून त्याची नमुना प्रत सादर केली गेली नाही. तसेच संस्था व महाविद्यालय यांचेतर्फे अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा सचिव तसेच संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य समितीसमोर उपस्थित राहिलेले नाहीत. संस्था आणि प्राचार्य यांचे प्रतिनिधी म्हणून आलेल्या व्यक्ती यांनी तक्रारीचे पृष्ठार्थ सुयोग्य कारणे अथवा सबळ कागदपत्रे समितीसमोर सादर केलेली नाहीत. समितीच्या असे निर्दशनास आले की, श्रीमती पिंजारी या सेवेत विनाखंड आहेत. त्यांचे ऑफलाईन वेतन नियमित होते. त्यानंतर सेवार्थ प्रणालीत होतेवेळी त्यांच्या अहर्ततेच्या मुद्यावरून पाचवड महाविद्यालयात बदली झाल्यानंतर त्यांच्या वेतनाबाबत प्रश्न निर्माण झालेले दिसून येतात. तसेच त्यानंतर मे.विद्यापीठ न्यायाधिकरण, पुणे यांच्या आदेशास अनुसरून सहसंचालक कार्यालयाने त्यास अनुसरून 'संस्थेकडून मार्गदर्शन घेवून नंतर उत्तर पाठविणे' असा प्राचार्यांनी शेरा नमूद केलेला दिसून येतो. मात्र त्यानुसार पत्रव्यवहार झालेची कोणतेही कागदपत्रे संस्था,

महाविद्यालय सादर करू शकले नाहीत. तक्रारदार यांच्या तक्रारीनुसार दि. १५/०६/२०१६ पासून १८ महिन्यांचे वेतन मिळाले नाही, तरी शिरवळ महाविद्यालय येथे कार्यरत असताना तक्रारदार यांना रितसर वेतन मिळत होते व बदलीच्या १८ महिन्यांच्या कालावधीनंतर तक्रारदार यांना नियमित वेतन अदा केले गेले आहे असे दिसून येते. या कारणास्तव समिती अशा निष्कर्षास येते की, १८ महिन्यांचे वेतन न देण्याबाबत कोणतेही सबळ कारण संस्था, महाविद्यालय सादर करू शकलेली नाहीत. सन २०१६-१७ मधील थकीत वेतनाची मागणी दि.०८/०२/२०२३ रोजी केली आहे. याबाबत संस्थेने तात्काळ मागणी करणे आवश्यक होते. झालेला विलंब अक्षम्य असून संस्था व महाविद्यालय सदरचे वेतन देयके अदा करण्यास जबाबदार आहेत. सबब संस्था व महाविद्यालय यांनी मा.विभागीय सहसंचालक यांचेकडील पत्र क्रं.शिसस/उशि/कोवी/अनि-२/२०२२/९९६३ दि.२८/१२/२०२२ चे पत्रास अनुसरून मा.विभागीय सहसंचालक कार्यालयास विहित प्रस्ताव पाठविण्याची कार्यवाही तात्काळ करून तक्रारदार यांना वेतन अदा करणे आवश्यक आहे.

२. तक्रारदार यांनी एम.फिल, पीएचडी, तीन वरिष्ठ वेतनश्रेण्या व सातवा वेतन आयोग दिला नाही अशी तक्रर नमूद केली आहे.

याबाबत तक्रारदार यांनी आपली नेमणूक दि. १/१२/२००० सालची होती व त्याआधी आपण दि.०८/०८/२००० ला एम.फिल होते त्यामुळे मला विद्यापीठाने आडवे ॲप्रुवल दिले. या आधारे विद्यापीठाने कॅम्पमधून एजीपी ७००० व एजीपी ८००० ची स्थाननिश्चिती दि.०४/०४/२०१४ रोजी केली. व दि.०२/०७/२०१४ रोजी एजीपी ९००० ची स्थाननिश्चिती विद्यापीठाकडून झाली. सदर सेवाशर्तीचे लाभ माझी दि.०१/१२/२००० ची नेमणूक तारीख ग्राहय धरूनच मिळाले. मी दि.०८/०८/२००० एम.फील प्राप्त असल्याने दि.०१/१२/२००० पासून दोन वेतनवाढीचे लाभ मिळाले होते. मात्र त्याची वेतननिश्चिती झाली नव्हती. पाचव्या वेतन आयोगाच्या वेतननिश्चितीला लोणंद महाविद्यालयाचे क्लार्क श्री.कांबळे यांनी एम. फिलच्या वेतनवाढी न घालता वेतननिश्चिती करून आणले. सदर वेतनवाढ चुकीची झाली आहे असा लेखी आदेश शि.सहसंचालक, कोल्हापूर यांचा असून संचालकांच्या रिकव्हरीचे पत्र नसताना माझी रू.१,१६,५०६/- इतक्या रक्कमेची वसुली केली. माझ्याकडून ती रक्कम कॉलेजच्या खाती जमा करून घेतली व ५ व्या वेतन आयोगाच्या फरकात मला ६०,८८४/- एवढा फरक कमी दिला व निमित्त एम.फिलच्या रिकवरीचे दाखवण्यात आले. आपली दि.१२/०४/२०१० ला पीएच.डी. प्राप्त असून त्यावेतनवाढीचे लाभ व एम.फिल. वेतनवाढीचे लाभाचे प्रस्ताव शि.सहसंचालक, कोल्हापूर यांना पाठवूनही त्या वेतनवाढीचे लाभ मिळाले नाहीत.

स्थाननिश्चितीच्या वेळी लोणंद महाविद्यालयात कार्यरत होते. त्या शाखेतून माझे पहिल्या दोन स्थाननिश्चितीचे प्रस्ताव पाठविणेत आले. माझ्या समवेत अन्य पाच केसेस प्राध्यापकांच्या होत्या मात्र ते सेट/नेट पास होते तुम्हांला एम.फिलवर सुट मिळाली आहे व तुमची सेवा नेमणेकीपासून ग्राहय धरली आहे म्हणून हे प्रकरण करून आणण्यासाठी रू.५०,०००/- इतकी रक्कम मागीतली. कामाची हमी नसल्याने आपण त्यास नकार दिला. म्हणून प्राचार्य टी.एन.घोलप व दोन क्लार्क यांनी मला त्रास दिला. प्राचार्य टी.एन. घोलप यांनी तुम्ही माझ्या स्वतः सहया केल्या मी तुमच्या कॅम्पला उपस्थित नव्हतो व तुम्ही स्थाननिश्चिती

करून आणली आहे अशी लेखी तक्रार रयत शिक्षण संस्थेस व विद्यापीठाकडे केली. विद्यापीठात स्थाननिश्चितीला महाविद्यालयाचे प्राचार्य, कॉलेजचा क्लार्क उपस्थित असणे विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे बंधनकारक आहे. ते ही व क्लार्क उपस्थित नव्हते व त्यांनीच आधी दोन दिवस सर्व कागदपत्रांवर सहया दिल्या व त्यांनीच चुकीची तक्रार दिली. त्यातील एजीपी ९००० असोसियट प्रोफेसरची फाईल लोणंद महाविद्यालयाकडून/विद्यापीठाकडून मला मिळाली नाही.

संस्था व महाविद्यालयाने दिलेल्या लेखी म्हणण्यामध्ये डॉ. सौ.पिंजारी यांचा स्थाननिश्चिती/वेतननिश्चितीबाबतचा प्रस्ताव शरदचंद्र पवार महाविद्यालय, लोणंद या महाविद्यालयातून पाठविणेत आला होता. त्यांनी पाचवड कॉलेजमधूनही माझा प्रस्ताव पाठवावा अशी वेळोवेळी मागणी केल्याने आमचे महाविद्यालयाने सदर प्रस्तावाच्या झेरॉक्स काढून आमचेकडील पत्र क्रं. ५७७/२०१८-१९ दि. २८/३/२०१९ चे पत्रानुसार सदर प्रस्ताव मा. विभागीय सहसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे कार्यालयाकडे पाठविला होता. विद्यापीठाने डॉ.सौ. पिंजारी विजया जगन्नाथ यांच्या मुळ नियुक्तीस शासन निर्णय दि. १३/०६/२००० व दि.१७/६/२००० नुसार मान्यता दिलेली आहे. वास्तविक पाहता अशा प्रकरणी स्थाननिश्चिती वा अन्य लाभ नियमाप्रमाणे देय ठरत नाहीत असे महाविद्यालयास कळविले असल्याचे म्हटले आहे.

संलग्नता टी १ विभागाकडून या प्रकरणी दिलेल्या अभिप्रायामध्ये डॉ.पिंजारी यांची दि.०४/०४/२०१४ रोजी झालेल्या स्थाननिश्चिती शिबीरामध्ये पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे वरिष्ठ श्रेणी (१००००-३२५-१५६००) व सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे स्टेज ३ (एजीपी ८०००) (वेतनश्रेणी १५६००-३९१००) मध्ये स्थाननिश्चीती केलेली आहे. तसेच त्यांची सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे सहयोगी प्राध्यापक एजीपी ९००० साठी दि.०२/०७/२०१५ रोजी झालेल्या स्थाननिश्चीतीसाठी कार्यवाही करण्यात आलेली आहे. तथापि प्रायार्य यांच्या दि.०१/०१/२०१६ च्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने या कार्यालयाने दि.१५/०२/२०१६ च्या पत्रान्वये डॉ.श्रीमती पिंजारी यांची स्टेज ४ सहयोगी प्राध्यापक पदाच्या प्रस्तावाबाबतची कार्यवाही स्थगित ठेवावी असे मा.शिक्षण सहसंचालक, उशि, कोल्हापूर यांना कळविले आहे. व त्याची प्रत प्राचार्यांना दिलेली आहे. तसेच श्रीमती पिंजारी यांचा स्थानिनिश्चती कॅम्प वेळी शॉर्ट टर्म कोर्स पुर्ण केलेला नसल्याने त्या अपात्र होतात. त्यामुळेच डॉ. श्रीमती पिंजारी यांना त्यांची सहयोगी प्राध्यापक पदाची स्थाननिश्चितीची मान्यता दिलेली नाही असे नमूद केले आहे.

याबाबत समितीचे मत असे की, विद्यापीठ शिक्षक मान्यता विभाग वेतन/स्थाननिश्चिती विहित शुल्क आकारून प्रक्रिया पार पाडते. तरीही तक्रारदारास त्यांच्या प्रस्तावावरील निर्णय न कळविणे ही बाब गंभीर आहे.

उपरोक्त सर्व परिस्थिती अवलोकनी घेता तक्रारदार यांची शैक्षणिक अहर्ता व अनुभव विचारात घेवून संस्था व महाविद्यालय यांनी स्थाननिश्चितीचा प्रस्ताव तात्काळ सादर करणे आवश्यक आहे.

३. तक्रारदार यांनी ७ व्या वेतन आयोगानुसार पगार दिला जात नसल्याचे तक्रारीत नमूद केले आहे.

याबाबत संस्था व महाविद्यालयाने दिलेल्या दि.२८/०३/२०२३ रोजीच्या लेखी अभिप्रायामध्ये डॉ.सौ. पिंजारी विजया जगन्नाथ यांचा पगार ७ व्या वेतन आयोगनुसार होणेसाठी मा.विभागीय सहसंचालक यांचेकडील पत्र क्रं.शिसस/उशि/ कोवी/अनि-२/२०२२/९९६३ दि. २८/१२/२०२२ यांचे पत्रानुसार माहे जानेवारी, २०२३ पासून त्यांचा पगार ७ व्या वेतन आयोगानुसार सुरू झालेला आहे. सोबत पगार बिलाची झेरॉक्स प्रत जोडली आहे. तसेच ७ व्या वेतन आयोगाच्या फरकाची माहे एप्रिल-२०१९ ते ७ वा वेतन आयोग सुरू होईपर्यंतच्या फरकाची मागणीही महाविद्यालयाने मा.विभागीय सहसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचेकडे आमचेकडील पत्र क्रं.४८७/२०२२-२३ दिनांक १३/०२/२०२३ ने केलेली आहे असे नमूद केले आहे.

या तक्रारीबाबत दोन्ही पक्षाचे म्हणणे विचारात घेता, तक्रारदार यांना जानेवारी २०२३ पासून ७ व्या वेतन आयोगानुसार वेतन देण्यात आल्याचे संस्था व महाविद्यालयाने कथन केले आहे. तसेच तक्रारदार यांनी समितीसमोर ते मान्य केले आहे. ७ व्या वेतन आयोगाच्या माहे एप्रिल-२०१९ ते ७ वा वेतन आयोग सुरू होईपर्यंतच्या फरकाची मागणीही महाविद्यालयाने मा.विभागीय सहसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचेकडे केली असल्याची माहिती दिली आहे. सबब तक्रारदार यांना ७ व्या वेतन आयोगानुसार वेतन सुरू झाले असल्याचे समितीच्या निदर्शनास येते. त्यामुळे तक्रारदार यांची सदरची मागणी निकाली काढणेत येते. संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांच्या ७ व्या वेतन आयोगानुसार होणाऱ्या फरकाबाबत योग्य तो पाठपूरावा संबधित कार्यालयाकडे करणे आवश्यक आहे.

४. तक्रारदार यांनी ऑनलाईन वेतनात आपल्या नावाचा समावेश नाही असे तक्रारीत नमूद केले आहे.

याबाबत संस्था व महाविद्यालयाने दिलेल्या लेखी खुलाश्यात डॉ. सौ.पिंजारी विजया जगन्नाथ यांचे ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन माहे जानेवारी, २०२३ पासून सुरू झालेले आहे. ऑनलाईन वेतनात नावाचा समावेश करणेबाबत मा.विभागीय सहसंचालक, कोल्हापूर यांचेबरोबर चर्चा करण्यात आली. परंतु जे सेवक ऑफलाईन पध्दतीने वेतन घेत आहेत. त्यांना ऑनलाईन वेतनात नाव समाविष्ठ करणेसाठी लेखी पत्रव्यवहार केलेला असून महाराष्ट्र शासनाकडून परवानगी येताच ऑफलाईन केसेस ऑनलाईनमध्ये घेणेत येतील असे तोंडी सांगण्यात आले असल्याचे नमूद केले आहे.

दोन्ही पक्षांनी समितीसमोर सादर केलेली कागदपत्रे अवलोकनी घेता, ऑनलाईन सेवार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करणेकरिता संस्था व महाविद्यालयाने आवश्यक ती कार्यवाही व त्याचा पाठपूरावा मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचेकडे करावा असे समितीचे मत आहे.

तक्रारदार यांनी तक्रारीमध्ये नमूद केलेल्या बऱ्याचशा तक्रारीबाबतची कार्यवाही मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे कार्यालयाशी निगडीत आहे. सबब महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ अंतर्गत कलम ७९ नुसार राज्य शासन व त्यांचे अधिकारी यांचे विरूध्दच्या तक्रारी या समितीच्या अधिकारक्षेत्रात येत नसलेने शासन कार्यालयाशी निगडीत कार्यवाहीबाबत समिती निर्देश देऊ शकत नाही.

करिता समिती खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांच्या १८ महिन्याच्या थकित वेतनाची मागणी मान्य करण्यात येते. संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांनी तक्रार अर्जात नमूद केलेल्या कालावधीतील १८ महिन्याच्या थकित वेतनाबाबत आवश्यक ती कार्यवाही तात्काळ पुर्ण करून आदेश प्राप्त झालेपासून एक महिन्याच्या आत थकित वेतन तक्रारदार यांना अदा करावे.

२. प्रस्ताव सादर करणेबाबत केलेला विलंब पाहता, तक्रारदार यांची शैक्षणिक अहर्ता व अनुभव विचारात घेऊन संस्था व महाविद्यालय यांनी स्थाननिश्चितीचा प्रस्ताव त्वरीत सादर करावा.

३. शिक्षक मान्यता विभागाने वेतन/स्थाननिश्चिती प्रस्तावावरील मान्य/अमान्य निर्णय अर्जदारांना निर्णय झाल्यापासून/बैठकीनंतर सात दिवसात कळविणेची दक्षता घ्यावी.

४. अर्जदाराच्या अर्जाबाबत कळवणेत झालेल्या विलंबाची स्वतंत्र चौकशी करून तक्रारदार यांची स्थाननिश्चिती/वेतननिश्चिती ६० दिवसात पुर्ण करावी.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधितांना देऊन तसे कळविण्यात यावे.

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

दिनांक : 0 6 APR 2023

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री. एस.यु.शिंदे)

सदस्य
(डॉ.एस.एस.महाजन )

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)

Ahkalekar
सदस्य
(डॉ. के. एच. कोलेकर)

(प्रा. हरिरेगेकर राम. पी.)